SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR - 416 004 MAHARASHTRA
PHONE: EPBX - 2609000 FAX:0091-0231-2691533 & 0091-0231-692333
DLL 0231 2609091, 2609135 Website : www.unishivaji.ac.in E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
Website Conduit : (1) Affiliation → Affiliation T2 Circulars (2) Affiliation → Affiliation T2 Information Lists
Estd : 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर - ४१६ ००४ महाराष्ट्र
दूरध्वनी ईपीबीएक्स- २६०९०००, फॅक्स ००९१ ०२३१ २६९१५३३ व ००९१ ०२३१ ६९२३३३
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ २६०९०९१, २६०९१३५

जा.क्र. शिवाजी वि/संलग्नता/टी-२/२०२३-२४/ No 496 दि. 06 MAY 2023
प्रति,

| | |
|---|---|
| १. प्राचार्य डॉ. अरुण बी. पाटील (अध्यक्ष)<br>कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,<br>उरूण-इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली.<br>फोन नं. - ०२३४२-२२१७७६<br>मो.नं. - ९४२३२७१६३६ | २. डॉ. श्रीमती सुवर्णा मोरे (सदस्या)<br>पद्मभूषण वसंतरावदादा पाटील महाविद्यालय,<br>कवठे-महांकाळ, ता.कवठे-महांकाळ, जि.सांगली.<br>फोन नं. - ०२३४१-२२२०१४<br>मो. नं. ९४२११३३४८२ |

विषय :- **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून खालील संलग्नीकरण प्रकाराच्या मान्यतेसाठी संलग्नीत महाविद्यालये / संस्थांकडून प्राप्त प्रस्तावान्वये नियुक्त स्थानिक चौकशी समितीबाबत...**

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, खाली नमुद केलेल्या महाविद्यालय / संस्थेच्या नावासमोर उल्लेखित प्रस्तावासंदर्भात चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ११४ व ११५ नुसार आपली स्थानिक चौकशी समिती नियुक्त करण्यात आली आहे.

| संस्था/महाविद्यालयाचे नाव व दुरध्वनी क्रमांक | संलग्नीकरण प्रकार | पाठयक्रम / अभ्यासक्रम इ. |
|---|---|---|
| श्री. गजानन कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, जाडरबोबलाद, ता.जत, जि.सांगली.<br>फोन नं. - ०२३४४-२२१०३६<br>मो.नं. - ७०२८२४३८१९ / ९५०३९९९८८४ | नुतनीकरण | १. बी.ए. भाग १, २ व ३<br>२. बी.एस्सी. भाग १, २ व ३ |

कृपया या पत्राच्या तारखेपासून **सात दिवसातील तारीख समिती अध्यक्षांनी स्वत: निश्चित करून** ती सर्व सदस्य व संबंधीत महाविद्यालयाच्या प्राचार्यांना कळवावी व समितीचा चौकशी अहवाल महाविद्यालयास भेट दिलेल्या तारखेस आपल्या प्रवासभत्ता-दैनंदिनभत्ता यांच्या देयकांसह विद्यापीठ कार्यालयास सादर करावा अशी विनंती आहे. या अंमलबजावणीवर पुढील कार्यवाही अवलंबून असल्याने तातडीने कार्यवाही होणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रस्तावास अनुसरुन करावयाच्या कार्यवाहीच्या संदर्भात समिती सदस्यांनी कृपया खालील बाबी विचारात घ्याव्यात.

१. समितीने महाविद्यालयात शिकविले जाणारे विषय/पाठ्यक्रम/विद्याशाखा/तुकड्या यांना शासन मान्यता व विद्यापीठ मान्यता आहे की नाही याची शहानिशा करुन वस्तुस्थितीजन्य माहिती अहवालात नमूद करावी.
२. नुतनीकरण/नैसर्गिक विस्तारासाठी अर्ज करणाऱ्या महाविद्यालयांनी आवश्यक बाबींची सिध्दता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम ११४ व ११५ मधील पोटकलमांना अनुसरुन करावयाची आहे व संलग्नीकरणाच्या संबंधित अर्जाप्रमाणे पाहणी करुन समितीने आपला अहवाल सादर करावयाचा आहे.
३. संबंधित महाविद्यालयास विद्यापीठाने परीक्षा केंद्र मंजूर केले असल्यास त्यासाठी आवश्यक त्या सोयी महाविद्यालयाने उपलब्ध केलेल्या आहेत किंवा नाहीत याची समितीने प्रत्यक्ष पाहणी करुन त्याबाबतच्या नोंदी व निरीक्षणांचीही अहवालात नोंद करावी.

...२



Scanned with OKEN Scanner